**ठळक बातम्या**

- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज आणि उद्या राज्याच्या दौऱ्यावर
- साखर कारखान्यांचा ऊस गळीत हंगाम यंदा १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार
- देशाला समृद्ध आणि विकसित बनवण्यासाठी महाराष्ट्राचं योगदान महत्वाचं असल्याचं विधानसभा अध्यक्षांचं प्रतिपादन
- अमेरिकेचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मायदेशी येण्यासाठी रवाना

**आणि**

- भारतीय शेअर बाजरांमधे सलग चौथ्या सत्रात निर्देशांकांचा नवा उच्चांक / सेन्सेक्सने प्रथमच ओलांडली ८५ हजाराची पातळी

**<><><><><>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आज आणि उद्या राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. नागपूर विमानतळावर आज दुपारी शहा यांचं आगमन झालं. आगामी विधानसभा निडवणुकीच्या अनुषंगाने ते रेशीम बाग इथे पक्षाच्या कार्यकर्त्यांशी तसंच अधिकाऱ्यांशी संवाद साधतील. त्यानंतर ते छत्रपती संभाजीनगरकडे रवाना होतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं आज छत्रपती संभाजीनगरला भेट देत आहेत.

<><><><><>

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत शेतकरी आणि शेतकरी संघटनांच्या नेत्यांशी चर्चा केली. आपण जवळपास ५० शेतकरी नेत्यांशी चर्चा करून त्यांचे मुद्दे जाणून घेतल्याचं चौहान यांनी बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी तिचा आत्मा आहेत, असंही ते म्हणाले. शेतकरी नेत्यांनी पिकांचे दर आणि पिक विमा याबद्दल अनेक सूचना केल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

<><><><><>

सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापनात पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्यात कॅग अर्थात नियंत्रक आणि महालेखापाल यांची भूमिका महत्त्वाची असल्याचं, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आज नवी दिल्लीत आशियाई देशातल्या सर्वोच्च लेखा संस्था संघटनेच्या १६ व्या बैठकीचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या. कॅग कार्यालय नैतिक आचरणाच्या आदर्श संहितेचं पालन करतं, ज्यामुळे त्याच्या कामकाजात प्रामाणिकतेचा स्तर सर्वोच्च असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं. हे अधिवेशन चार दिवस चालणार आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार काल संध्याकाळी संपला. दुसऱ्या टप्प्यात २६ विधानसभा मतदारसंघात उद्या मतदान होणार आहे. यामध्ये २५ लाख ७८ हजार मतदार २३९

उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद करतील. ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

साखर कारखान्यांचा ऊस गळीत हंगाम यंदा १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. त्यानुसार साखर कारखान्यांनी आणि आयुक्तालयानं कार्यवाही करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. आगामी सण, आणि राज्य विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन, ऊस गळीत हंगाम सुरू करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून गाळप हंगामाची तारीख निश्चित करण्यात आली आहे. केंद्र सरकारनं यंदा उसाचा रस, साखर सिरप, तसंच इथेनॉल निर्मितीसाठी परवानगी दिली आहे. साखर उद्योगाशी संबंधित असलेल्या डिस्टिलरी प्रकल्पांमधील रेक्टिफाइड स्पिरिट आणि ईएनए अल्कोहोलवरच्या शुल्काबाबत देखील यावेळी चर्चा करण्यात आली. खांडसरी उद्योगांना मान्यता आणि गूळ उत्पादन नियंत्रणाबाबत सरकारकडे अहवाल सादर करण्यात आला असून, त्यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात येईल, असं पवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशाला समृद्ध आणि विकसित बनवण्यासाठी महाराष्ट्राचं योगदान महत्वाचं असल्याचं प्रतिपादन विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलं. नवी दिल्ली इथं राष्ट्रकुल देशातल्या लोकप्रतिनिधी गृहांच्या पदाधिकाऱ्यांची १० वी परिषद सुरू आहे. यात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासा संदर्भात विधानमंडळाची भूमिकाया विषयावर आपलं मत मांडताना नार्वेकर बोलत

होते. महाराष्ट्र हे वेगानं नागरीकरण होणारं राज्य असल्याचं नार्वेकर म्हणाले. राज्यात सार्वजनिक वाहतुकीचं विस्तारित जाळं, इलेक्ट्रिक वाहनं, गृहनिर्माण प्रकल्प उभारले जात असल्याचंही नार्वेकर यांनी सांगितलं. शहरांबरोबरच ग्रामीण भागात रोजगाराची संधी निर्माण करणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

अमेरिकेचा तीन दिवसांचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परत येण्यासाठी निघाले आहेत. या दौऱ्यात डेलावेआर इथं क्वाड परिषदेत ते सहभागी झाले तसंच न्यूयॉर्कमधे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत भविष्यातलं जग या विषयावरच्या परिषदेत त्यांचं भाषण झालं. अमेरिकेतल्या भारतीय समुदायाने आयोजित केलेल्या कार्यक्रमातही ते सहभागी झाले होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांची डेलावेर इथं भेट घेतली. यावेळी दोन्ही देशात दोन करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यानंतर प्रधानमंत्री मोदी यांनी जपान, ऑस्ट्रेलिया, नेपाळ, कुवेत, पॅलेस्टिन या देशांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा केली.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून ५ दिवसांच्या उझ्बेकिस्तान च्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. या दौऱ्यामध्ये उद्या त्या एशियन इंफ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेच्या ९ व्या वार्षिक सभेला उपस्थित राहणार आहेत. भारत आणि उझ्बेकिस्तान दरम्यान होणाऱ्या द्विपक्षीय गुंतवणूक करारावर त्यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या होतील.

**<><><><><>**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या सदस्य संख्येत यंदाच्या जुलै महिन्यात आतापर्यंतची सर्वाधिक म्हणजे  २० लाख सदस्यांची वाढ झाली आहे, गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत  ही वाढ २ पूर्णांक ४३ शतांश टक्के  इतकी आहे. कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी काल नवी दिल्लीत ही माहिती दिली. या वर्षी जून मधे  १० लाख ५२ हजार नवीन सदस्यांनी नोंदणी केली असल्याचं दिसून आलं. १८ ते २५ वयोगटामध्ये  ९ लाख  इतकी सर्वाधिक वाढ दिसून आली. तर जुलैमध्ये तीन लाखांहून अधिक नवीन महिला सदस्यांनी कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमध्ये सहभाग नोंदवला आहे. या एकूण वाढीमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, हरियाणा आणि गुजरात या राज्यांचा वाटा सुमारे ६० टक्के असल्याचंही आकडेवारीवरून दिसून येत आहे.

**<><><><><>**

अमेरिकी फेडरल रिझर्व्हने गेल्या आठवड्यात केलेल्या कर्जावरच्या व्याज दरकपातीचा परिणाम भारतीय शेअर बाजारांवर दिसून आला. भारतीय शेअर बाजाराच्या सेन्सेक्स आणि निफ्टी या निर्देशांकांनी आज सलग चौथ्या सत्रात नवा विक्रमी उच्चांक गाठला. आज सकाळच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने प्रथमच ८५ हजाराची पातळी ओलांडली तर निफ्टीनेही २५ हजार ९७९ अंकांची विक्रमी वाढ नोंदवली.

**<><><><><>**

बदलापूरच्या खासगी शाळेतल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे काल पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत ठार झाला. दुसऱ्या एका प्रकरणात त्याला काल तळोजा कारागृहातून चौकशीसाठी ठाण्याला नेत असताना, मुंब्रा बायपास इथं त्याने अचानक एका पोलिस अधिकाऱ्याचं रिव्हॉल्वर हिसकावून त्याच्यावर गोळीबार केला. यावेळी अन्य एका अधिकाऱ्याने प्रत्युत्तरात शिंदेवर तीन गोळ्या झाडल्या. यात गंभीर जखमी झाल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी या माहितीस दुजोरा दिला आहे. शिंदे याने दोन विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केल्याबद्दल त्याच्याविरोधात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले होते.

**<><><><><>**

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिकेच्या वतीनं स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. रॅलीची सांगता होताना सर्वांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

**<><><><><>**

यवतमाळ इथले ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक, कामगार आणि शिक्षक संघटना नेते डॉ. शरद कळणावत यांचं आज सकाळी निधन झाले. ते 90 वर्षांचे होते. शरद कळणावत यांनी नागपूर आणि अमरावती दोन्ही विद्यापीठांमध्ये कार्यकारी मंडळ आणि विद्वतसभा सदस्य, अधिष्ठाता, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून जबाबदाऱ्या पार पडल्या. अमरावती विद्यापीठाची पहिली डॉक्टरेट त्यांना मिळाली होती. उच्च शिक्षण क्षेत्रातला राज्य शासनाचा

उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला होता. नुटा या प्राध्यापक संघटनेचे आणि महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेचे ते आधारस्तंभ होते.

**<><><><><>**

**रत्नागिरी** जिल्ह्यात बऱ्याच दिवसांच्या विश्रांतीनंतर काल पावसानं जोरदार हजेरी लावली. आज सकाळपर्यंत जिल्ह्यात **संगमेश्वरमध्ये** सर्वाधिक ७३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मुंबई उपनगर आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये काल मध्यरात्री विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला.

भारतीय हवामान विभागानं उद्या सकाळपर्यंत **मुंबईसाठी** यलो अलर्ट जारी केला आहे. **रायगड** जिल्ह्यात उद्यापर्यंत ऑरेंज अलर्ट तर **ठाणे** आणि **पालघरमध्ये** उद्यापर्यंत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. **मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणात** काही ठिकाणी येत्या शुक्रवारपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**